" प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान" राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेस अधिकार प्रदान करणे व अभियानाच्या तरतुदींमध्ये सुधारणा/बदल करणे.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०१५/प्र.क्र.१९५/रोस्वरो-१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जानेवारी, २०१६.

वाचा : १) केंद्र शासन, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक १५ जुलै, २०१५.
२) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्रमांक कौविउ-२०१५/ प्र. क्र.१२२/ रोस्वरो-१, दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५.
३) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.३७/अभि-१, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५.

प्रस्तावना :

राज्यातील युवक -युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार /स्वंयरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यास या विभागाच्या दि. ०२ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदरील शासन निर्णयाप्रमाणे अभियानाची अंमलबजावणी प्रभावी व सुलभरित्या होण्याच्या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांना अधिकार प्रदान करणे, त्याचप्रमाणे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील भौतिक लक्ष्य साध्य करण्यासाठी विहित प्रक्रीयेतून सूट मिळणे इत्यादीं कौशल्य विकास अभियानाच्या अंमलबजवाणीकरीता आवश्यक तरतूदीं संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता होती.

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाचे वित्तीय वर्ष सन २०१५-१६ हे प्रथम वर्ष असल्यामुळे चालू आर्थिक वर्षाकरीता संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ मधील सदर अभियानाच्या अंमलबजावणीकरीता विहित करण्यात आलेल्या तरतूदीं/अटीं मध्ये तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांना अधिकार प्रदान करणेबाबत शासन निर्णय कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, दिनांक ०३ ऑगस्ट, २०१५ अन्वये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेने बदल/सुधारणा व अधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

"प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास" अभियानाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यांस या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

१. **प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या परिस्थितीनुरुप प्रशिक्षणाशी निगडीत तसेच प्रशासकीय बाबीं संदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांना प्रदान करण्यात येत आहेत.**

१.१. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये उद्योगांचा थेट सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने वेळोवेळी निर्णय घेणे तसेच यासंदर्भात उद्योग समूहांसमवेत लवचिक सामंजस्य करार (Flexi MoU) करणे.

१.२. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ च्या परिशिष्ट १ मधील अ.क्र.१.६.४ अन्वये विहित केलेल्या मार्गदर्शन सूचनांमध्ये NSQF शी सुसंगत असलेले व राष्ट्रिय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT), सेक्टर स्किल कौन्सिल (SSC), नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC), राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (SCVT) व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था (MSSDS) इत्यादींनी मान्यता दिलेले अभ्यासक्रम आणि औद्योगिक आस्थापनांनी मागणी केलेले उपयुक्त अभ्यासक्रम राबविण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. ज्या संस्था/विभाग/प्राधिकरण यांनी मान्यता दिलेल्या तसेच विशेष मागणी असलेल्या (Tailor made) अभ्यासक्रमांचे अनुषंगाने Soft Skill व Hard Skill यांचे प्रमाण, प्रशिक्षण कालावधी, तुकडीची प्रवेश क्षमता, प्रशिक्षकांची शैक्षणिक अर्हता, प्रवेशाकरिता किमान शैक्षणिक अर्हता, प्रमाणिकरण इत्यादी बाबींची निश्चिती झाली नसल्यास सदर बाबी निश्चित करणे.

१.३. कौशल्याची निकड/ अभ्यासक्रमांच्या आवश्यकतेनुसार Recognition of Prior Learning, Re-Skilling व Up-Skilling संदर्भात केंद्र शासनाकडे संमत निकष निर्धारीत नसल्यास निकष निश्चित करणे.

१.४. व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र (CGCC), कौशल्य प्रशिक्षण संस्था (STPs) व मुल्यमापन संस्था (Assessing Body) यांच्या पात्रतेबाबतच्या निकषांमध्ये संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या सहकार्याने आवश्यकतेनुसार बदल/सुधारणा करणे.

१.५. व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र (CGCC), कौशल्य प्रशिक्षण संस्था (STPs), मुल्यमापन संस्था (Assessing Bodies) यांचे मुल्यमापन व पुनर्विलोकन त्रयस्थ

संस्थेमार्फत करण्याकरीता, त्रयस्थ संस्थेच्या पात्रतेचे निकष निश्चित करून विहित पध्दतीने निवड करणे.

१.६. जिल्हा व क्षेत्रनिहाय मनुष्यबळाची मागणी निर्धारीत करण्यासंदर्भातील Micro level Skill Gap Study करण्याकरिता नियुक्त करावयाच्या एजन्सीच्या पात्रतेचे निकष ठरवून विहित पद्धतीने नियुक्ती करणे व अशा संस्थेकडून प्राप्त अहवालाच्या आधारे तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्यानुसार प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाची अंमलबजावणी करणे.

१.७. प्रशिक्षण संस्थांची (VTP) मान्यता रद्द करण्याबाबतची केंद्र शासनाच्या दिनांक १५ जुलै, २०१५ च्या अधिसूचनेतील परिशिष्ट-IV मधील अ.क्र.२ (iii) तरतूद प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांसंदर्भात लागू करण्याच्या दृष्टीने निकष निश्चित करणे.

उपरोक्तप्रमाणे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर केल्याबाबतचा आढावा घेण्यात येवून, दर तीन महिन्यांनी अहवाल शक्ती प्रदत्त समितीस सादर करण्यांत यावा.

२. **अभियानाच्या अंमलबजावणीचे वित्तीय वर्ष २०१५-१६ हे प्रथम वर्ष असल्यामुळे चालू आर्थिक वर्षाकरिता शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ अनुसार प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या अंमलबजावणीकरीता विहित करण्यांत आलेल्या तरतूदीं/अटीं मध्ये बदल करून खालील प्रमाणे कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. -**

२.१. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हानिहाय लक्ष्य कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून निर्धारीत करुन ते महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेकडे (MSSDS) पुढील अंमलबजावणीकरिता सादर करणे.

२.२. प्रशिक्षणाकरिता इच्छूक उमेदवारांचे प्रशिक्षणपूर्व चाचणी व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन प्रक्रीयेपासून सूट देण्यांत येवून, कौशल्य प्रशिक्षण संस्थांनी इच्छुक उमेदवारांची प्रशिक्षणपूर्व चाचणी घेवून त्यांचे स्तरावर प्रवेश देण्यांत यावा.

२.३. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेच्या (MSSDS) महाकौशल्य पोर्टल वर तांत्रिक अडचण उद्भवल्यास केंद्र/राज्य शासनाच्या इतर विभागांच्या मान्यताप्राप्त web portal ची मदत घेऊन किंवा Offline पध्दतीने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाची अंमलबजावणी करणे.

३. शक्ती प्रदत्त समितीने दिलेल्या निदेशानुसार चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस (सन २०१५-१६) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या विहित कार्यपध्दतीचा आढावा घेवून, त्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांनी शक्ती प्रदत्त समितीस सादर करावा. जेणेकरून या अहवालाच्या अनुषंगाने

पुढील आर्थिक वर्षामध्ये सदर अभियानाबाबत विहित कार्यपध्दती राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

उपरोक्त शासन निर्णय मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली गठींत करण्यांत आलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीच्या अनुषंगाने मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११२१६४८०२८००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santokh Singh Sandhu

Digitally signed by Santokh Singh Sandhu
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Santokh Singh Sandhu
Date: 2016.01.12 16:49:30 +05'30'

**( एस. एस. संधू )**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा.मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. सर्व विधान परिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ,
७. मा.मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद ), मुंबई,
११. आयुक्त, कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, कफ परेड, मुंबई,
१३. आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१६. महालेखापाल (लेखा परीक्षा) -१, महाराष्ट्र, मुंबई,
१७. महालेखापाल (लेखा परिक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर,
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१९. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२०. सर्व विभागीय आयुक्त,
२१. सर्व जिल्हाधिकारी,
२२. आयुक्त सर्व महानगरपालिका,
२३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायती,
२५. संचालक (प्रशिक्षण/व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
२६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/ नाशिक,
२७. उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/नागपूर/ अमरावती/औरंगाबाद /नाशिक,
२८. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,
२९. निवड नस्ती.